# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०९/०८/२०१७

## मा. अपर पोलीस महासंचालक सो. यांचे हस्ते जिल्हा पोलीस दलाच्या ५ अधिकाऱ्यांना वेगवर्धित पदोन्नती बहाल

आज दिनांक ०९/०८/२०१७ रोजी पोलीस उपमुख्यालय प्राणहिता येथे मा. अपर पोलीस महासंचालक (नक्षलविरोधी अभियान) श्री. डी. कनकरत्नम सा़ो. यांचे हस्ते जिल्हा पोलीस दलात कार्यरत असणाऱ्या ५ पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांना सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी वेगवर्धित पदोन्नती बहाल करण्यात आली.

गडचिरोली जिल्हा पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी हे आपल्या जिवाची पर्वा न करता रात्रंदिवस नक्षल्यांविरुध्द लढा देत असतात. नक्षल्यांविरुध्द लढा देवून नक्षल्यांना कंठस्नान घालत नक्षल चळवळीला हादरवून सोडणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा वेळोवेळी शासनाने गौरव केला आहे. अशाच, नक्षल्यांना कंठस्नान घालण्यात यशस्वी शुर पोलीस अधिकाऱ्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून आज एकूण ५ अधिकाऱ्यांना वेगवर्धित पदोन्नती देण्यात आली. त्यांची नावे पुढील प्रमाणे...

१) राजेश खांडवे
२) ज्ञानेश्वर उदार
३) महारुद्र परजने
४) मिठू जगदाळे
५) बाळासाहेब शिंदे

अपर पोलीस महासंचालक ( नक्षलविरोधी अभियान) श्री. डी. कनकरत्नम सा़ो. यांनी पदोन्नती बहाल करण्यात आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांचा सत्कार करीत त्यांना शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या नक्षल विरोधी अभियानाचा आढावाही घेतला. तसेच विशेष अभियान पथक येथे कार्यरत असणाऱ्या जवानांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) श्री. शरद शेलार, पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र श्री. अंकुश शिंदे, पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, अपर पोलीस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधिक्षक अहेरी ए. राजा, अपर पोलीस अधिक्षक डॉ. हरी बालाजी, अपर पोलीस अधिक्षक श्री. महेंद्र पंडित तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.